परीपत्रक

कालमर्यादित/ अतिमहत्वाचे

जा.क्र/मरापप/जीसीसी/मूल्य/२०१८/2329

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग पुणे १.

दिनांक : १०/४/२०१८.

प्रति,

संस्थाचालक,

शासनमान्य संगणक टायपिंग/ टंकलेखन व लघुलेखन संस्था, सर्व

महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय :- शासकीय संगणक टायपींग प्रमाणपरीक्षा( G.C.C.-T.B.C.- 30 व 40 wpm ) तसेच स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर ॲण्ड स्टुडंट (GCC-SSD-CTC) तसेच टंकलेखन व लघुलेखन जुन - २०१८ साठी मराठी, हिंदी, इंग्रजी. प्राश्निक/ समिक्षक ऑनलाईन नोंदणी करणे बाबत.**

उपरोक्त विषयी सर्व शासनमान्य संगणक टायपिंग टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालक/ प्राचार्य यांना कळविण्यात येते की, संगणक टायपींग प्रमाणपत्र परीक्षा जुन - २०१८ च्या परीक्षेसाठी (मराठी ३०,४० हिंदी ३०, ४० इंग्रजी ३०, ४० श.प्र.मि.) **स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर ॲण्ड स्टुडंट (GCC-SSD- CTC)** तसेच टंकलेखन व लघुलेखन प्राश्निक/ समीक्षकांची निवड ऑनलाईन अर्जाव्दारे करण्यात येणार आहे. सदरचे अर्ज ऑनलाईनव्दारे दि. १६ एप्रिल २०१८ पर्यंत करावेत. परीक्षा परिषदेत प्रत्यक्ष अथवा पोस्टाव्दारे प्राश्निक व समीक्षक यांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

सर्व शासनमान्य शासकीय संगणक टायपिंग, टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालक/ प्राचार्य/ निदेशक यांना आवाहन करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, पुणे-१ www.mscepune.in या संकेतस्थळावर प्राश्निक/ समीक्षक ऑनलाईन अर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तरी इच्छुकांनी प्राश्निक/ समीक्षक अर्ज ऑनलाईन भरावा. प्राश्निक/ समीक्षक निवड झाल्यानंतर सदरच्या कामासाठीचे मानधन व प्रवास/ दैनिक भत्ता नियमानुसार अदा करण्यात येईल. ऑनलाईन अर्जासोबत सदर कामाबाबत आवश्यक असणारे लेखी संमतीपत्र व प्रमाणपत्र अपलोड करावे.

(सुखदेव डेरे)

आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

पुणे-१.

E/computer typ.Abh.letter 1Imp